दैनिक
# साहसिक
epaper
www.sahsik.com
सजग समाजाचा दक्ष प्रहरी

वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

वर्ष : १५ | अंक : १२० | बुधवार १० नोव्हेंबर २०२१ | मुख्य संपादक : रविंद्र एन. कोटंबकार | (पृष्ठ -८) | मूल्य : ३ रुपये

### सुविचार

'जग बदलायचे असेल तर आधी स्वतःला बदलवा'.
-महात्मा गांधी

### चारोळी

बोटांना माझ्या आता
वेगळं राहायला आवडत नाही ..
तुझ्या बोटात गुंतल्या शिवाय
त्यांना ही करमत नाही

### हसा जरा जपून..

शिक्षक: उशीर का झाला शाळेत यायला?
चिंटू: आई बाबा भांडत होते,
शिक्षक: त्याचा उशिरा येण्याशी काय संबंध?
चिंटू: माझा एक बूट आईच्या हातात व दुसरा बाबांच्या हातात होता.

# लसीच्या दुष्परिणामांमुळे कोणाचा मृत्यू झाल्यास किंवा कोणतेही दुष्परिणाम झाल्यास लस पूर्णतः सुरक्षीत आहे अशी खोटी जाहीरात करुन लस घेण्यास प्रोत्साहन देणारे किंवा लस घेण्यास सक्ती करणाऱ्या सर्व सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध फसवणूक, हत्या, हत्येचा प्रयत्न (मर्डर) व इतर गुन्हे दाखल होवू शकतात ?

* आरोपी अधिकारी हे पिडित व्यक्तीला नुकसान भरपाई देण्यास व्यक्तीशः बाध्य राहतील.
* लसींचे दुष्परिणाम नाही झाले तरी सर्वांना मिळणार नुकसान भरपाई.
* इंडियन बार असोसिएशनचे सर्व नागरिकांना पत्र.

**वृत्तसंस्था / ०९ नोव्हेंबर**

**मुंबई :** इंडियन बार असोसिएशनच्या लीगल सेल प्रमुख ॲड. दीपाली ओझा यांनी जनतेच्या नावाने इंडियन बार असोसिएशनच्या लेटर हेडवर एक पत्र जारी केले आहे. त्या पत्रात त्यांनी नागरिकांनी कोरोना लसीबाबत महत्वपूर्ण माहिती जाणून घेणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. त्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे औरंगाबादच्या डॉ. स्नेहल लुणावत यांचा मृत्यू **'कोव्हीशील्ड'** लस घेतल्यामुळे झाला असल्याचे सरकारच्या AEFI समीतीने मान्य केले. लसींच्या दुष्परिणामांमुळे लोकांचे मृत्यू होत असल्यामुळे १८ युरोपियन देशांनी कोव्हीशिल्ड (Astrazenica) या लसीला बंदी घातली होती. लसीच्या दुष्परिणामामुळे लस घेणाऱ्यांचा जीव जावू शकतो. त्यांना बहिरेपणा, अर्धांगवायू, आंधळेपणा, रक्त गोठणे (Blood Clotting)



ॲड. दिपाली ओझा

असे गंभीर व जीवघेणे दुष्परीणाम होवू शकतात. देशात आतापर्यंत ४५०० पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू लसीच्या दुष्परिणामांमुळे झाला आहे. कोरोना लसीच्या दुष्परिणामामुळे मरण पावलेल्या लोकांची माहिती देणाऱ्या वर्तमानपत्रात प्रकाशीत बातम्या खालील लिंक वर उपलब्ध आहेत. कोरोना लसीच्या विविध दुष्परिणामांची माहिती सर्व नागरिकांना व लस घेणाऱ्या प्रत्येकाला देण्याची जबाबदारी ही लसीबाबतचे

उर्वरित पान २ वर




# राज्यभरातील ३७६ एसटी कर्मचाऱ्यांचं निलंबन?; संपावरून सरकार कडक भूमिकेत!

**वृत्तसंस्था / ०९ नोव्हेंबर**

**मुंबई :** राज्यात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या एसटी कर्मचाऱ्यांच्या आत्महत्या व प्रलंबित मागण्यांच्या पार्श्वभूमीवर एसटी कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन पुकारले आहे. तर, हे आंदोलन थांबावे व एसटी कर्मचाऱ्यांनी कामावर रूजू व्हावे, असे सरकारकडून वेळोवेळी आवाहन केले जात आहे. मात्र, एसटी कर्मचारी आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. परिणामी एसटी वाहतुक ठप्प झाली असून, सणासुदीच्या काळात सर्वसामान्यांना याचा फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर आता राज्य सरकारने देखील कडक भूमिका घेत, राज्यभरातील ३७६ एसटी कर्मचाऱ्यांना निलंबित केले असल्याची माहिती समोर आली आहे.

राज्यभरातील १६ विभागातील ४५ आगारामधील ३७६ एसटी कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे. यामध्ये नाशिक विभागातील कळवण आगारातील १७ कर्मचारी, वर्धा विभागातील वर्धा आणि हिंगणघाट आगारामधील ४० कर्मचारी, गडचिरोली विभागातील अहेरी, ब्रह्मपुरी, गडचिरोली आगारातील १४ कर्मचारी, चंद्रपुर विभागातील चंद्रपुर, राजुरा, विकाशा आगारातील १४ कर्मचारी, लातुर विभागातील औसा, उदगीर, निलंगा, अहमपुर, लातुर आगारातील ३१ कर्मचारी, नांदेड विभागामधील किनवट, भोकर, माहुर, कंधार, नांदेड, हादगाव, मुखेड, बिलोली, देगलुर आगारातील ५८ कर्मचारी, भंडारा विभागामधील तुमसर, तिरोडी, गोंदिया आगारामधील ३० कर्मचारी, सोलापुर विभागातील अक्कलकोट आगारामधील २ कर्मचारी, यवतमाळ विभागातील पांढरकवडा, राळेगाव, यवतमाळ आगारातील ५७ कर्मचारी, औरंगाबाद विभागातील औरंगाबाद-१ आगारातील पाच कर्मचारी, परभणी विभागातील हिंगाली व गंगाखेड आगारातील १० कर्मचारी, जालना विभागातील जाफ्राबाद व अंबड आगारातील १६ कर्मचारी, नागपूर विभागामधील गणेपेठ, घाटरोड, इमामवाडा, वर्धमान नगर आगारातील १८ कर्मचारी, जळगाव विभागातील अंमळनेर आगारातील चार कर्मचारी, धुळे विभागातील धुळे आगारातील दोन कर्मचारी, सांगली विभागातील जत, पलुस, इस्लामपुर, आटपाडी आगारातील ५८ कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याचे समोर आले आहे.

तसेच, 'एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाच्या विरोधात न्यायालयने आदेश दिला होता आणि हा संप बेकायदेशीर ठरवला होता. त्यानंतर देखील काही संघटनांनी, एसटीच्या संपाची नोटीस दिली होती आणि म्हणून आम्ही उच्च न्यायालयात गेलो होतो. उच्च न्यायालयाने हा संप बेकायदेशीर आहे, असं जाहीर केलेलं आहे. हे जाहीर केल्याच्या नंतर देखील, हा संप सुरू असल्याचं काल आम्ही उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर, उच्च न्यायालयाने सूचना केली की याबाबत तुम्ही अवमान याचिका दाखल करू शकतात. म्हणून एसटी महामंडळ अवमान याचिका दाखल करत आहे. ' असं आज परिवहनमंत्री अनिल परब यांनी सांगितलेलं आहे.

